# महाराष्ट्र न्युज नेटवर्क

Pune Vol. 2, Issue - 18 (Monday) 21 October to 27 October 2024 (Weekly) Price Rs. 1/- Pages - 8

पुणे वर्ष २रे, अंक १८ वा (सोमवार) २१ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर २०२४ (साप्ताहिक) किंमत १ रुपये पाने ८

संपादक : अभिजीत डुंगरवाल
मो : 9923133815




## मंडई मेट्रो स्थानकाला आग लागली कशी?

### दोषींवर कारवाई : 'महामेट्रो'च्या संचालकांचे स्पष्टीकरण

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे: शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या मंडई मेट्रो स्थानकात वेल्डिंगचे काम सुरू असताना आग लागल्याची घटना रविवारी मध्यरात्री घडली. फोमला आग लागल्यामुळे मोठ्या प्रमाणात धूर निर्माण झाला. आग लवकर आटोक्यात आणण्यात मेट्रोच्या अग्निशमन यंत्रणेला यश आले नाही, त्यामुळे अग्निशमन दलाला मदतीसाठी पाचारण करण्यात आले. या पार्श्वभूमीवर इतर कामे सुरू असलेल्या मेट्रो स्थानकांमध्ये आगीबाबत कोणती काळजी घेतली जात आहे, असा प्रश्न विचारला जात आहे.**

या आगीची 'महामेट्रो'कडून चौकशी सुरू असून, दोषींवर कारवाई करण्यात येईल, असे 'महामेट्रो'च्या संचालकांनी स्पष्ट केले आहे. 'महामेट्रो'ने जिल्हा न्यायालय ते स्वारगेट हा मार्ग काही दिवसांपूर्वीच सुरू केला. या मार्गावरील गर्दी असलेल्या मंडई मेट्रो स्थानकात आग लागल्यामुळे खळबळ उडाली. आगीची माहिती दडपण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा आहे.

'महामेट्रो'चे जनसंपर्क अधिकारी आचारसंहितेचे कारण पुढे करून अधिक माहिती देण्यास तयार नव्हते, ज्यामुळे प्रवाशांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. तिकीट काउंटरच्या पाठीमागे असलेल्या एस्कलेटरजवळ रात्री वेल्डिंगचे काम सुरू होते. वेल्डिंगच्या ठिणग्या फोमवर पडल्यामुळे आग लागली. चौकशी सुरू असून, दोषी आढळल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असे 'महामेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितले.

## दिवाळीचा फराळ निघाला परदेशात

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे: भारतीय सणांचा राजा म्हणजे दिवाळीचा उत्सव. चला, चला, दिवाळी आता काही दिवसांवर आली आहे, आणि परदेशात काम करणाऱ्या आपल्या मुलाबाळांना फराळ पाठवण्यास सुरुवातही झाली आहे. जगाच्या पाठीवर कोठेही राहायला गेले तरी दिवाळीच्या फराळाच्या बाबतीत तडजोड करता येणार नाही. हो, मानसिकता आणि उत्साहामुळे पुणेकरांच्या कुरिअर कंपन्यांकडे सध्या फेऱ्या वाढल्या आहेत.**

परदेशात राहणाऱ्या मुलांना, नातवंडांना आणि नातेवाईकांना दिवाळीत फराळाचा आनंद देणाऱ्या कुरिअर सेवेला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, ब्रिटनसह युरोपमधील सर्व लहान-मोठ्या देशांमध्ये फराळाची वाहतूक सुरू झाली आहे.

कुरिअर कंपन्यांमध्ये फराळाचे पार्सल पाठवण्याची लगबग सुरू आहे. गेल्या काही वर्षांत शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने पुण्यातून परदेशात गेलेल्या नागरिकांची, तरुणांची संख्या मोठी आहे. अनेक कुटुंबे तिकडे स्थायिक झाली आहेत. या सर्व भारतीयांकडून



तिथे दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. त्यामुळे पुण्यातील त्यांचे कुटुंबीय आवर्जून दिवाळीच्या निमित्ताने दरवर्षी फराळ पाठवतात. खाद्यपदार्थांच्या बाबतीत देशनिहाय असलेले निर्बंधही गेल्या काही वर्षांत शिथिल झाले आहेत. त्यामुळे परदेशात फराळ पाठवणाऱ्यांची संख्याही वाढली आहे.

यावर्षी फराळ पाठवण्याचा खर्च वाढला असला तरी पाठवणाऱ्यांची संख्या कायम आहे. परदेशाबरोबरच देशांतर्गत फराळ आणि भेटवस्तू पाठवण्यासाठी टपाल विभागाच्या कार्यालयांमध्ये सध्या मोठी लगबग सुरू आहे. ग्राहकांकडून आणलेल्या पदार्थांच्या आणि वस्तूंच्या पॅकिंगसाठी नवीन मशिनरीदेखील आणण्यात आली आहे. दिवाळीनिमित्त परदेशात फराळ पाठवणाऱ्यांची संख्या दरवर्षी वाढत आहे. गेल्या वर्षी आम्ही फराळ कुरिअरला सुरुवात केली. पहिल्याच वर्षी साडेसात हजार किलो साहित्य परदेशात पाठवले, ज्यातून ५० लाख रुपयांचे उत्पन्न टपाल विभागाला मिळाले. यंदा एक कोटी रुपयांचे लक्ष्य ठेवले असून, उपनगरांमधील टपाल कार्यालयांमध्येही ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच, घरी जाऊन फराळ कुरिअर संकलनाची व्यवस्थाही केली आहे, अशी माहिती टपाल विभागाने दिली आहे.

परदेशात फराळ पोहोचवण्याची व्यवस्थाही टपाल विभागाने केली आहे. नागरिकांकडून फराळाचे पदार्थ घेतले जातात आणि पोस्टाचे कर्मचारी आंतरराष्ट्रीय नियमांनुसार त्यांचे पॅकिंग करून देतात. गेल्या वर्षी मिळालेला प्रतिसाद पाहून यावर्षी शहरातील जिल्हा पोस्ट ऑफिस आणि कुरिअर कंपन्या अमेरिका, ब्रिटन, युरोपमधील देश, ऑस्ट्रेलिया आणि काही आखाती देशांमध्ये फराळ पाठवत आहेत. देशनिहाय खाद्यपदार्थांवर काही निर्बंध असले तरी दिवाळीच्या फराळाला बहुतांश वेळा अडचण येत नाही. ग्राहकांनी आणलेल्या पदार्थांचे उत्तम पॅकिंग करून दिले जाते. यावर्षी आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे कुरिअरचे दर वाढले आहेत, तरीदेखील लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, असे कुरिअर कंपनीतील सूत्रांनी सांगितले.

## सणासुदीत खाद्यतेलाचा चटका

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : ऐन दिवाळीच्या तोंडावर खाद्यतेलाच्या दरात वाढ होऊ लागली आहे.**

महिनाअखेरीस दिवाळी सुरू होत आहे. अशावेळी सर्व सामान्याच्या खिशाला दरवाढीचा फटका बसणार आहे. तेलबियांचे उत्पादन मागील वर्षीपेक्षा तीन टक्के अधिक राहण्याची शक्यता असूनही ऐन सणासुदीत खाद्यतेलाच्या दरात वाढ झाली आहे. दहा दिवसांत दर २० टक्क्यांनी महागले आहेत. त्यात मलेशियाकडून येणाऱ्या पामतेलाचे दर सहा महिन्यांच्या उच्चांकावर असताना दिवाळीच्या वाढत्या मागणीत खाद्यतेल आणखी महागण्याची शक्यता आहे. देशात यंदा विविधी खाद्यतेलबियांची सरासरी ५.२० लाख हेक्टरवर अधिक पेरणी झाली आहे. हा आकडा मागील वर्षीच्या पेरणीच्या पाच टक्के अधिक आहे. त्यातून तयार होणाऱ्या खाद्यतेलामुळे यंदा देशात



मागील वर्षीपेक्षा तीन टक्के अधिक खाद्यतेल उपलब्ध आहे.आधी नवरात्रात खाद्यतेलाच्या मागणीत वाढ होतीच. मात्र, यंदा दिवाळी महिन्याच्या सुरुवातीला असल्याने ग्राहकांनी आत्ताच त्यासाठीची खरेदी सुरू केली आहे. परिणामी मागील दहा दिवसांत सर्वच खाद्यतेलांच्या दरात २० टक्क्यांची वाढ दिसून येत आहे. किरकोळ ग्राहक खरेदी करीत असलेल्या राइस ब्रान व सोयाबीन तेलाचा किरकोळ दर आतापर्यंत ११० रुपये प्रतिलिटरच्या घरात होता. तो दर आता १२५ रुपयांच्या घरात गेला आहे. १२५ रुपयांचे सूर्यफूल तेल १४० ते १४५ रुपये तर, १६० ते १७० रुपयांचे शेंगदाणा तेल १९० रुपयांच्या घरात गेले आहे.

## शासकीय कर्मचाऱ्यांनी हेल्मेट वापरणे बंधनकारक

### दंडात्मक कारवाई : सेवा पुस्तकातही होणार नोंद

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पुणे विभागातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषद, महाविद्यालये तसेच शासकीय यंत्रणांच्या कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना दुचाकी वाहन वापरताना हेल्मेट वापरणे बंधनकारक करण्यात आले आहे.**

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी निर्देश दिले आहेत. नियमभंग करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर संबंधित प्राधिकरणाने दंडात्मक कारवाई करुन त्यांच्या सेवा पुस्तकातही कारवाईची नोंद घ्यावी, अशा सूचनादेखील त्यांनी दिल्या आहेत. यासंबंधीचे परिपत्रक डॉ.



पुलकुंडवार यांनी जारी केले आहे. मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम १२९ नुसार तसेच उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार दुचाकी चालविणाऱ्या तसेच दुचाकीवर पाठीमागे बसणाऱ्या व्यक्तीने हेल्मेट परिधान करणे बंधनकारक आहे. मोटार वाहन कायद्यातील तरतूदींचे पालन करणे प्रत्येक शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे.

हेल्मेटचा वापर न करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) मधील तरतुदीनुसार संबंधित कार्यालय प्रमुखांनी शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यामार्फत दंड वसूलीची कार्यवाही करावी. तसेच याची नोंद मूळ सेवापुस्तकात घेण्याची कार्यवाही करावी, असेही परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

# संपादकीय


अभिजित डुंगरवाल

## ग्राहक समाधानी असेल, तरच व्यवसाय मोठा होईल

गेल्या बऱ्याच काळात आपण पाहत आलो आहोत की अनेक उद्योजक काळानुसार आणि ग्राहकांनुसार वेगवेगळ्या प्रमोशनच्या पद्धती वापरत आहेत. त्याचप्रमाणे सध्या प्रचंड लोकप्रिय होत असलेली प्रमोशन पद्धत म्हणजे ग्राहकांना समाधानी आणि आनंदी ठेवणे. आज भारतात सर्वच क्षेत्रांत स्पर्धा खूप वाढली आहे. त्यामुळे नवीन ग्राहक मिळवण्याशिवाय आहेत त्या ग्राहकांना समाधानी ठेवणेसुद्धा अत्यंत महत्त्वाचे झाले आहे.

एखाद्या उद्योगातून खरेदी करताना ते कोणत्या सोयीसुविधा पुरवतात हे आज सर्वच ग्राहक पाहू लागले आहेत. जर आपण त्यांना हव्या तशा सोयीसुविधा उपलब्ध करून देऊ शकलो, तर हे समाधानी ग्राहक आपल्याला त्यांच्या खरेदीतून नफा देतात, शिवाय ते आपले मोफत विक्रेतेसुद्धा होतात. वर वर पाहता हे खूप साधे आणि सोपे वाटते, परंतु आज जर आपण ग्राहकांना नेमक्या कोणत्या सोयीसुविधा अपेक्षित आहेत हे पाहायला गेलात तर आपल्याला असंख्य उत्तरे मिळतील ज्यांचा ना आपण कधी विचार केला असेल, ना त्या आपल्या बजेटमध्ये बसणाऱ्या असतील. त्यामुळे आज आपण काही अशा गोष्टी पाहू ज्या कोणताही उद्योजक सहज अमलात आणून आपल्या ग्राहकांना जास्तीत जास्त आनंदी आणि समाधानी ठेऊ शकेल. आनंदाने आणि आपुलकीने स्वागत करणे. प्रत्येक ग्राहकाकडे वैयक्तिक लक्ष देणे. ग्राहकांच्या जास्तीत जास्त प्रश्नांचे निवारण करणे. वारंवार सामान्यपणे विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची सूची बनविणे. (FAQs) ग्राहकांच्या अपेक्षेप्रमाणे शंकांचे निवारण करणे. वेळेच्या आधी उत्पादन पुरवणे. आपली चूक झाली असेल तर त्यावर पांघरूण घालत बसण्यापेक्षा ती मान्य करणे. छोटी वस्तू घेवोत आथवा मोठी, प्रत्येक ग्राहकाला समान दर्जा देणे. सणांच्या दिवशी ग्राहकांना शुभेच्छा देणे.

जे ग्राहक आपल्याकडून पुन्हा खरेदी करतील त्यांना काही सवलती देणे. आपल्या उद्योगाच्या विविध कार्यक्रमांत ग्राहकांना आवर्जून बोलावणे. ग्राहकांच्या फोन कॉल्सना उत्तर देणे आणि त्यांच्याशी आपुलकीने बोलणे. याप्रकारे आपल्या ग्राहक आणि उद्योगानुसार अनेक छोट्या-छोट्या गोष्टींतून प्रत्येक ग्राहक आपल्याला किती महत्त्वाचा आहे हे जर आपण दाखवून देत राहिलात तर आजच्या स्पर्धेच्या युगात आपण नक्कीच इतरांच्या पुढे जाऊ शकाल.

# पोलीस स्मृतिदिनानिमित्त पोलीस हुतात्म्यांना अभिवादन

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**मुंबई : पोलीस स्मृतिदिनानिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गतवर्षात संपूर्ण देशभरात शहीद झालेल्या पोलीस हुतात्म्यांना नायगाव पोलीस मुख्यालय येथील पोलीस स्मृतिस्तंभावर पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली.**



या वेळी पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत व प्रतिनिधी, वरिष्ठ पोलीस अधिकारी व निमंत्रित यांनीही पोलीस स्मृतिस्तंभाजवळ जाऊन हुतात्म्यांना अभिवादन केले.

सुरुवातीला राज्यपालांनी आपल्या संदेश वाचनातून गेल्या वर्षभरात देशात हौतात्म्य प्राप्त झालेले 39 पोलीस अधिकारी व 177 पोलीस अमलदारांना त्यांच्या अतुलनीय बलिदानाबद्दल श्रद्धांजली वाहिली.

शहीद झालेल्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांची नावे वाचून दाखविल्यानंतर पोलीस बँड पथकाद्वारे सलामी शस्त्र धून वाजविण्यात आली. यावेळी गणवेशधारी अधिकारी व जवानांनी सलामी दिली तसेच पोलिसांतर्फे अभिवादन रूपात बंदुकीच्या तीन फैरी झाडण्यात आल्या. राज्यपालांनी निमंत्रित देश-विदेशी पाहुणे, वरिष्ठ पोलीस अधिकारी व हुतात्म्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली.

# पुण्याच्या रिंग रोडलगतची गावे होणार चकाचक

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : फक्त पुण्याला लागून असलेली नव्हे तर पुण्याच्या नियोजित रिंग रोडलगतची गावेही आता चकाचक होणार आहेत.**



पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या रिंग रोडलगतची सुमारे ११७ गावे कात टाकणार आहेत. या गावांचा आर्थिक, सामाजिक विकास करून तेथे पर्यटनाचा विकास करण्यासाठी राज्य रस्ते विकास महामंडळाला आरक्षण (एमएसआरडीसी)ने 'विशेष नियोजन केले आहे. प्राधिकरणा'चा दर्जा देण्यात आला रुपयांची आहे. हवेली, भोर, पुरंदर, वेल्हे आणि बाचा दावा मुळशी या तालुक्यांतील गावांचा यात समावेश आहे.

राज्य सरकारने रिंग रोडसाठी ४२, ७११ कोटी रुपयांच्या सुधारित प्रशासकीय प्रस्तावाला नुकतीच मान्यता दिली. त्यानुसार, रस्ते विकास महामंडळाने या कामासाठी निविदा पात्र ठरलेल्या कंपन्यांना 'लेटर ऑफ ॲक्सेप्टन्स' (एलओए) देण्याची सुरु केली आहे.. सुमारे १७२ किलोमीटर लांबीचा आणि ११० मीटर रुंदीचा हा रिंग रोड असणार आहे. 'पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा'च्या (पीएमआरडीए) हद्दीतील ८१४ पैकी ११७ गावे 'एमएसआरडीसी' हद्दीत आहेत. रिंग रोड लगतच्या गावांमदील दोन 'ग्रोथ सेंटर'चा विकास करण्यासाठी एकूण ७४६ चौरस किलोमीटर क्षेत्रापैकी ६६८ चौरस किलोमीटर क्षेत्रामध्ये या गावांचा समावेश आहे. नागरी आणि ग्रामीण भागातील विकास केंद्रांच्या नियोजित विकासासाठी ७८.०८ चौरस किलोमीटरचे क्षेत्र वगळण्यात आले आहे. या ११७ गावांच्या विकासासाराठी राज्य रस्ते विकास महामंडळाची विशेष प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्याचा प्रस्ताव नगर विकास विभागाला पाठविण्यात आला होता. प्रस्तावाला नगरविकास विभागाने मान्यता दिली आहे.

रिंग रोड प्रकल्पाचे महत्त्व पाहता आणि एकूण खर्चाचा विचार करता विकासाशी संबंधित खर्चाची भरपाई करण्यासाठी जमीन भाडेतत्त्वावर देण्यासाठी विविध 'लँड पुलिंग मॉडेल्स'चा वापर करण्यात येणार आहे. हवेली, भोर, पुरंदर, मुळशी, शिरूर आणि वेल्हे तालुक्यांतील गावांचा यात समावेश आहे.

# आचारसंहिता भंगाच्या 776 तक्रारी

## 31 कोटी 16 लाख रुपयांची मालमत्ता जप्त

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**मुंबई : राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ साठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. १५ ते २१ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत राज्यभरातील सी–व्हिजिल (C–VIGIL) ॲपवर एकूण ७७६ तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्यापैकी ७७३ तक्रारी निवडणूक आयोगाने निकाली काढल्या आहेत. याचा अर्थ, एकूण ९९ टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली.**



सजग नागरिकांना आचारसंहितेचे पालन सुनिश्चित करण्यासाठी सहकार्य करणारे सी-व्हिजिल (C-Vigil) ॲप कोणत्याही ॲपस्टोअरमधून डाउनलोड करता येते. या ॲपद्वारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार नोंदवता येते. तक्रार नोंदवल्यानंतर संबंधित पथक चौकशी करून योग्य ती कारवाई करते.

राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज, मौल्यवान धातू इत्यादींची एकूण ३१ कोटी १६ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. आचारसंहितेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचेही डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले.

# सरकार देणार तरुणाना 20 लाख रुपयांचे कर्ज

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**नवी दिल्ली : देशातील उद्योजकतेलाप्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने न? पंतप्रधान मुद्रा योजनेंतर्गत (पीएमएमवाय) मिळणाऱ्या कर्जाची मर्यादा दुप्पट वाढवून २० लाख रुपये केली आहे. केंद्रीय वित्त मंत्रालयाने एका निवेदनाद्वारे ही माहिती दिली. या वाढीच्या माध्यमातून आम्ही मुद्रा योजनेचा सर्वंकश उद्देश पुढे नेऊ इच्छितो, असे वित्त मंत्रालयाने म्हटले आहे.**




यासंबंधीची अधिसूचना गुरुवारीच जारी झाली असल्याची माहिती देण्यात आली. वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला तेव्हा म्हटले होते की, पंतप्रधान मुद्रा योजनेची विद्यमान दहा लाख रुपयांची कर्जमर्यादा वाढवून २० लाख रुपये केली जाईल. ज्यांनी 'तरुण' श्रेणीअंतर्गत घेतलेले आधीचे कर्ज नियमितपणे फेडले आहे. त्यांना वाढीव मर्यादेचा लाभ मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ एप्रिल २०१५ रोजी ही योजना सादर केली होती. बिगर-कॉर्पोरेट, बिगर-कृषी लघु व सूक्ष्म उद्योजकांच्या उत्पन्नाच्या साधनासाठी दहा लाख रुपयांपर्यंत सुलभ व हमीदारमुक्त सूक्ष्म कर्ज उपलब्ध करून देणे हा या योजनेचाउद्देश होता. सध्या या योजनेत ३ श्रेणीत कर्ज दिले जाते. शिशु (५० हजार रुपयांपर्यंत), किशोर (५० हजार ते ५ लाख रुपयांपर्यंत) आणि तरुण (१० लाख रुपयांपर्यंत).

'महाराष्ट्र न्युज नेटवर्क' RNI NO. MAHMAR/2023/88387 हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अभिजित ताराचंद डुंगरवाल यांनी कल्याणी कार्पोरेशन, १४६४, सदाशिव पेठ, पुणे -४११०३० येथे छापून ऑफिस नं. ३०१ तुलसी अपार्टमेंट, महावीर पार्क जवळ, स्वामी समर्थ नगर, काकडे वस्ती, कोंढवा बु., पुणे -४११०४८. येथे प्रसिद्ध केले. प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

"Maharashtra News Network" RNI NO. MAHMAR/2023/88387 Weekly Publication is Owner, Publisher, Editor Abhijit Tarachand Dungarwal, Printed at Kalyani Corporation, 1464, Sadashiv Peth, Pune : 411 030 and Published at Office No. 301, Tulsi Apts., Near Mahavir Park, Swami Samarth Nagar, Kakde Wasti, Kondhwa BK., Pune - 411 048. Editor, Printer & Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Pune court Mo. : 9923133815

# दिवाळीच्या खरेदीसाठी पुण्यात गर्दी शहरातील वाहतुकीत बदल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : दिवाळी सणानिमित्त पुणे शहरातील मध्यवर्ती भागात बाजारपेठांमध्ये खरेदीकरिता ग्राहकांची मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी लक्षात घेता शहरातील वाहतूक सुरळीत रहावी म्हणून 5 नोव्हेंबर 2024 पर्यंत वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.**



याअंतर्गत शिवाजीनगरवरून शिवाजी रोडने जाणारी चारचाकी वाहने स. गो. बर्वे चौकातून जाणारी वाहतूक जंगली महाराज रस्ता-टिळक चौक या पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे.स्वारगेटवरून बाजीराव रोडने शिवाजीनगरकडे पुरम चौक मार्गे जाणारी चारचाकी वाहने पुरम चौकातून डावीकडे वळून टिळक रोडने एस. पी. कॉलेज अलका चौक मार्गे इच्छितस्थळी जातील. आप्पा बळवंत चौकातून बुधवार चौकाकडे येणारी वाहतूक आवश्यकतेनुसार बंद करण्यात येईल.

ही वाहने बाजीराव रोडने सरळ पुढे इच्छितस्थळी जातील.फुटका बुरूज वरून जोगेश्वरी चौकाकडे येणारी वाहतूक आवश्यकतेनुसार बंद करण्यात येईल. त्यासाठी इच्छितस्थळी जाण्यासाठी शिवाजी रोडवरुन सरळ पुढे जाणारा पर्यायी मार्ग राहील. शनिपार चौकाकडून तसेच कुमठेकर रोडवरून मंडईकडे जाणारी वाहतूक आवश्यकतेनुसार बंद करण्यात येईल. याकरिता पर्यायी मार्ग म्हणून बाजीराव रोडने सरळ पुढे जाता येईल. पार्किंग व्यवस्था

दिवाळीसणानिमित्त बाजारपेठेत बाजीराव रोड, शिवाजी रोड, लक्ष्मी रोड, कुमठेकर रोड, केळकर रोड व मंडई या भागात खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांनी आपली वाहने बाबू गेनू पार्किंग, मिसाळ पार्किंग, हमालवाडा पार्किंग व साने वाहनतळ याठिकाणी पार्क करावीत, अशा सूचना वाहतूक शाखेचे पोलीस उप आयुक्त अमोल झेंडे यांनी दिल्या आहेत.

# प्रवाशांना लुटणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्सची तपासणी मोहीम सुरु

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पुणे प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) गुरुवारपासून खासगी ट्रॅव्हल्सची तपासणी मोहीम हाती घेतली. पहिल्याच दिवशी ८२ गाड्यांची झाडाझडती घेण्यात आली. पैकी ३६ गाड्यांनी नियमभंग केल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांना साडेतीन लाखांचा दंड ठोठावण्यात आला.**



दिवाळीच्या हंगामात खासगी ट्रॅव्हल्सच्या विरोधात तिकीट दरवाढीच्या तक्रारी वाढतात. या पार्श्वभूमीवर 'आरटीओ'कडून खासगी ट्रॅव्हल्स संघटनांसोबत ग बुधवारी बैठक घेण्यात आली. त्यांना नियमांपेक्षा जास्त तिकीटदर आकारू नये; अन्यथा कारवाई करण्यात येईल, अशी ताकीद देण्यात आली. त्यानुसार, 'आरटीओ'ने दोन पथकांमार्फत गुरुवारी रात्रीपासून ट्रॅव्हल्स बसच्या तपासणीला सुरुवात केली. पाच नोव्हेंबरपर्यंत ही कारवाई सुरू राहणार आहे. शहरात विविध 66 ठिकाणी खासगी ट्रॅव्हल्सची आरटीओकडून तपासणी करण्यात येत आहे. नियमभंग केलेल्या ट्रॅव्हल्सवर दंडात्मक कारवाई सुरू आहे. आगामी काही दिवस कारवाई सुरू राहणार आहे. अशी माहिती - स्वप्नील भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी दिली. ट्रॅव्हल्स सुटणाऱ्या ठिकाणी जाऊन तपासणी करण्यात आली. दोन पथकांकडून विविध ठिकाणी ८२ बसची तपासणी करण्यात आली. तपासणीत एकाही बसमध्ये जादा दराने तिकिटाची आकारणी झाल्याचे आढळून आले नाही. बसचा फिटनेस संपणे, परिवहन विभागाच्या अटींचा भंग करणे, प्रवासी बसमधून मालवाहतूक करणे, बॅज न लावणे आदी प्रकार आढळून आले. आहेत. द्द्यांच्या हंगामात एसटी आणि रेल्वे यांचे बुकिंग फुल्ल असल्याने खासगी बसचालक याचा गैरफायदा घेतात. परिवहन विभागाच्या नियमानुसार ५० टक्के जास्त दर घेण्याची मुभा खासगी वाहनचालकांना देण्यात आली आहे. तरीही ते प्रवाशांकडून दुप्पट ते तिप्पट भाडे आकारून लूट करतात. ही लूटमार 'आरटीओ'ने थांबवावी; तसेच खासगी वातानुकूलित बसचे दरपत्रक ठरवून द्यावे, अशी विनंती 'अर्बन सेल'कडून करण्यात आली आहे.

# मिरच्यांचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे: शिल्लक मालामुळे बाजारपेठेत मिरचीच्या दरांत साठ टक्क्यांनी घट झाली आहे. बाजारात लाल मिरचीच्या मागणीत लक्षणीय घट झाली आहे. दर कमी झाल्यामुळे मिरचीचा ठसका कमी झाला आहे. चालू हंगामात लाल मिरचीचे उत्पादन झाले नसले, तरी वर्षभर पुरेल इतका साठा गोदामात असल्याने लाल मिरचीच्या दरात साठ टक्के घट झाली आहे. नवीन हंगाम जानेवारीत सुरू होईल.**



मिरचीची मसाले आणि लाल पावडर तयार करणाऱ्या कंपन्या खरेदी करतात. गुजरातच्या बियाडगी मिरचीचा हंगाम डिसेंबरमध्ये सुरू होणार आहे. गुंटूर मिरचीचा हंगाम जानेवारी ते फेब्रुवारीमध्ये सुरू होईल. मागील हंगामातील माल अद्यापही मोठ्या प्रमाणात शिल्लक आहे. त्यामुळे पुढील काही महिने मिरचीचे दर कमी राहतील.

**मिरचीच्या घाऊक बाजारातील क्विंटलचे दर :** गुंटूर १८,००० ते २०,००० रुपये, लवंगी २०,००० ते २२,००० रुपये, बियाडगी २०,००० ते २३,००० रुपये, काश्मिरी २८,००० ते ३०,००० रुपये आहेत.

मागील वर्षीच्या हंगामात आणि चालू वर्षाच्या सुरुवातीला मिरचीला चांगली मागणी होती. त्यामुळे दरही चांगले मिळत होते. सध्या मागणीच्या तुलनेत आवक अधिक आहे, तसेच गोदामात माल मोठ्या प्रमाणात शिल्लक आहे. यंदा अद्याप नवीन माल बाजारात दाखल झाला नसला तरी सद्यस्थितीत मिरची पिकाची स्थिती उत्तम आहे. वातावरण चांगले असल्यामुळे उत्पादन वाढणार आहे. त्यामुळे या हंगामात दरात वाढ होण्याची शक्यता कमी आहे. सध्या तरी सर्व प्रकारच्या मिरचीचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्यात आहेत. मागील हंगामाच्या तुलनेत दरात ६० टक्के घट झाली आहे.

# शेतकऱ्यांना पीककर्ज वाटपात बँकांचा हात आखडता

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : शेतकऱ्यांना पीककर्ज वाटपात बँकांनी हात आखडता घेतल्याचे दिसत आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.**



यंदाच्या खरीप हंगामात ४,४५४ कोटींच्या कर्ज वाटपाच्या दिलेल्या उद्दिष्टापैकी आतापर्यंत तीन हजार १९३ कोटींचे पीककर्ज वाटप करण्यात आले आहे. पुणे जिल्ह्यात खरीप हंगामाच्या उद्दिष्टांच्या तुलनेत ७२ टक्के कर्ज वाटप केले आहे. जिल्हा बँकेच्या तुलनेत खासगी बँकांकडून कर्जवाटपामध्ये उदासीनता दिसून आल्याने त्याबाबत जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. कर्ज वाटपात सुधारणा करावी, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी खासगी बँकांना दिले आहेत.

खरीप हंगामातील पीक कर्जवाटपाबाबत झालेल्या बैठकीत नाढावा घेण्यात आला. निल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, बँक ऑफ महाराष्ट्र'चे महाप्रबंधक . जावेद मोहनवी, 'रिझर्व बँके'चे ण लगाते, 'नाबार्ड'चे विनीत भट, बेश पाटील, वृषाली सोने, कृषी नकारी संजय काचोळे आदी उपस्थित होते.

पुणे जिल्ह्यातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी नाममात्र कर्ज वाटप केले आहे. पुढील काळात कर्ज वाटपाचे वाढविण्यात सुधारणा करण्यात यावी,' असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील देलेल्या १२१३.७६ कोटींच्या की ६७३ कोटींचे कर्ज वाटप हे. एकूण उद्दिष्टाच्या ५०.९० आहे.

खरिपासह अन्य हंगामातील वार्षिक पीककर्जवाटपासाठी पुणे जिल्ह्यात सहा हजार ३७० कोटींचे उद्दिष्ट दिले होते. मार्च २०२५ पर्यंत हे कर्ज वाटप करायचे आहे. एकूण उद्दिष्टाच्या तुलनेत तीन हजार १९३ कोटी (५० टक्के) रुपये वाटप करण्यात आले आहे. जिल्ह्याच्या एकूण वार्षिक ऋण योजनेत तीन लाख एक हजार ६०० कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी एक लाख १७ हजार ३४६ कोटींचे (३८.९१ टक्के) कर्जवाटप करण्यात आले आहे, असेही या वेळी सांगण्यात आले.

दरम्यान, पुणे जिल्ह्यासाठी यंदाच्या खरीप हंगामात ४,४५४.६४ कोटी रुपयांच्या कर्जाचे उद्दिष्ट होते. त्यापैकी आतापर्यंत तीन हजार १९३ कोटी रुपयांचे कर्जवाटप झाले आहे. जिल्हा बँकेला २३८१.६८ कोटींचेउद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी बँकेने आतापर्यंत २३३५ कोटींचे कर्जवाटप (९८ टक्के) केले आहे. खासगी बँकांना यंदाच्या खरिपात ८५१.७५ कोटींच्या दिलेल्या नुकते उद्दिष्टापैकी २३६.४७ कोटींचे कर्ज वाटले आहे, अशी माहिती या वेळी बैठकीत देण्यात आली.

# एक देश-एकच सोन्याचा भाव करण्याचा प्रयत्न

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**नवी दिल्ली : संपूर्ण देशात सोन्याचा भाव एकच करण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. त्यामुळे सोन्याच्या दरातील तफावत दूर होणार आहे.**



'एक देश एक कर', 'एक देश एक निवडणूक' याप्रमाणे 'एक देश एक सुवर्णभाव' अर्थात संपूर्ण भारतात सोन्याचा एकच भाव असावा; जेणेकरून सोन्याच्या खरेदी-विक्रीमध्ये राज्याराज्यांतून दिसणारी तफावत टाळता येईल. यासाठी 'दी ऑल इंडिया जेम अँड ज्वेलरी डोमेस्टिक कौन्सिल' (जीजेसी) प्रयत्न करणार आहे, अशीघोषणा 'जीजेसी'ने केली आहे.

'देशात सोन्याची मोठ्या प्रमाणावरआयात केली जाते. आयात सोन्याचा भाव देशाच्या कोणत्याही भागात सारखाच असतो. मात्र, सोन्याच्या किरकोळ विक्रीचा भाव स्थानपरत्वे बदलतो. त्यामुळे देशात सोन्याचा भाव एकसमान असणे गरजेचे आहे,' असे 'जीजेसी'चे सचिव मितेश धोरडा यांनी सांगितले. मंगळवारपासून नऊ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या 'लकी लक्ष्मी' या वार्षिक सुवर्ण महोत्सवाची सुरुवात केल्यानंतर ते बोलत होते. 'एक देश एक सुवर्णभाव' या मोहिमेसाठी 'जीजेसी'ने सदस्य सराफांसमवेत ५०हून अधिक बैठका घेतल्या आणि त्यानंतर केंद्रासमोर सादरीकरणही केले. सध्या देशात वेगवेगळ्या शहरात सोन्याचे दर समान नाहीत.

# पांगारकर यांच्या शिवसेनेतील नियुक्तीला स्थगिती

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : श्रीकांत पांगारकर यांच्या शिवसेनेतील नियुक्तीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशामुळे स्थगिती देण्यात आली आहे.**




पत्रकार गौरी लंकेश यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी श्रीकांत पांगारकर यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. जालना विधानसभेच्या प्रमुखपदी त्यांची नियुक्ती केली होती. या नियुक्तीवरून शिवसेनेवर चौफेर टीका झाली. विरोधकांसह शिवसेनेचे अनेक पदाधिकारी पांगारकर यांच्या नियुक्तीवर आक्षेप घेत होते. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या नियुक्तीबाबत मोठा निर्णय घेतला आहे.

शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने श्रीकांत पांगारकर यांना जालना जिल्ह्यात शिवसेना पक्षाचे जर कोणतेही पद देण्यात आले असेल, तर त्या पदाच्या नियुक्तीला स्थगिती देण्यात आल्याचे शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे म्हटले आहे.

# खेड शिवापूर टोलनाक्यावर जप्त केली 5 कोटींची कॅश

## आयकर विभागाने घेतली रोकड ताब्यात : पुण्यातून साताऱ्याकडे जात होती गाडी

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी 20 नोव्हेंबरला मतदान होणार आहे. निवडणुकीच्या काळात निवडणूक आयोगाचे भरारी पथक विविध चेकपोस्टवर वाहनांची तपासणी करत असताना पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर पुणे ग्रामीण पोलिसांनी पाच कोटींची रोकड जप्त केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही रोकड इनोव्हा क्रिस्टा कारमध्ये होती. आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी ही रोकड ताब्यात घेतली आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खेड शिवापूर टोल नाक्याजवळ एका खासगी वाहनात कोट्यवधीची रोकड सापडल्याचं उघड झालं आहे. ही रक्कम सातारा शहराच्या दिशेने नेण्यात येत होती. सध्या पोलीस आणि निवडणूक आयोगाचे अधिकारी या प्रकाराचा तपास करत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात सापडलेल्या रोकडमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

ही रक्कम जवळपास पाच कोटी असल्याचा अंदाज आहे. पुणे-सातारा महामार्गावर मोठ्या प्रमाणात रोख रक्कम नेली जाणार असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती.

सोमवारी दुपारपासून पोलिसांनी खेड शिवापूर टोल नाक्याजवळ नाकाबंदी केली होती. रात्रीच्या सुमारास एक संशयित वाहन पोलिसांना आढळले. पोलिसांनी ते वाहन थांबवून तपासणी केली असता त्यात मोठ्या प्रमाणात रोकड सापडली. सध्या खेड शिवापूरच्या राजगड पोलीस ठाण्यात अधिक तपास सुरू आहे.

# प्रवाशांना लुटणाऱ्या रिक्षा चालकास अटक

## खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : रात्रीच्या वेळी प्रवाशांना चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या रिक्षाचालक आणि त्याच्या साथीदारांना पोलिसांनी अटक केली आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुण २१ ऑक्टोबर रोजी आंबेजोगाई येथून पुण्यात आला होता. मध्यरात्री दीडच्या सुमारास ते रिक्षात बसले. प्यासा हॉटेल ते सेव्हन लव्ह चौक दरम्यान, रिक्षाचालक आणि त्याच्या दोन साथीदारांनी फिर्यादीला चाकूचा धाक दाखवून मारहाण केली. खिशातील पाचशे रुपये आणि मोबाईल काढून घेतले आणि त्याला रस्त्यावर सोडून पळून गेले. या प्रकरणी खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तत्परतेने तपास करून रिक्षाचालक शहामुद्दीन निजामुद्दीन मुल्ला (वय २४, रा. बिबवेवाडी) आणि त्याच्या इतर दोन साथीदारांना अटक केली आहे.

सहायक पोलीस निरीक्षक अनिल सुरवसे तपास करीत आहेत.

# येरवडा कारागृहात इस्त्री व लॉन्ड्री विभागाचे उद्घाटन

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : येरवडा कारागृह येथे सर्वसामान्य नागरिकांसाठी सोयीसुविधांनी सुसज्ज इस्त्री व लॉन्ड्री विभागाचे उद्घाटन सुनील एन. ढमाळ, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे यांच्या हस्ते व अनिल खामकर, अधीक्षक, येरवडा खुले कारागृह, पी. पी. कदम, अतिरिक्त अधीक्षक, येरवडा कारागृह यांच्या उपस्थितीत करण्यात आले.**



सदर उपक्रम प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व डॉ. जालिंदर सुपेकर (भा.पो.से.), विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या संकल्पनेतून स्वाती साठे, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी सुनिल एन. ढमाळ, अधीक्षक, पी. पी. कदम, अति. अधीक्षक, डॉ. बी. एन. ढोले, उपअधीक्षक, आर. ई. गायकवाड, उपअधीक्षक, एम. एच. जगताप, उपअधीक्षक, आनंदा एस. कांदे, वरीष्ठ तुरुंग अधिकारी, सुषमा चव्हाण, कारखाना व्यवस्थापक, बी. एम. शिंदे, तुरुंग अधिकारी व सर्व तांत्रिक संवर्गीय कर्मचारी यांनी काम पाहिले.

# नव राजस्थान सोसायटीतून चंदनाची झाडे चोरीस

## चतुःश्रृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पुणे शहराच्या गजबजलेल्या परिसरातील एका सोसायटीतून चंदनाची झाडे चोरीस गेली आहेत. या प्रकरणी चतुःशृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना २० आणि २१ ऑक्टोबरच्या रात्री घडली. प्लॉट क्र. १२, नव राजस्थान सोसायटी, एस. बी. रोड, पुणे आणि प्लॉट क्र. ०८, नीलकमल, विश्रामबाग सहकारी गृहनिर्माण सोसायटी, एस. बी. रोड, येथे फिर्यादींची ६०,००० रुपयांची दोन चंदनाची झाडे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने कापून चोरून नेली.

# सिमेंटचा ब्लॉक डोक्यात मारून ठार मारण्याचा प्रयत्न

## बिबवेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : किरकोळ वादातून आणि जुन्या भांडणातून एका तरुणाच्या डोक्यात सिमेंटचा ब्लॉक मारून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.**



या प्रकरणी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणात इंदिरानगर, बिबवेवाडी येथील तरुणाने फिर्याद दिली आहे. २० ऑक्टोबरच्या रात्री साडेबाराच्या सुमारास फिर्यादी तरुण त्याच्या मित्रासह बालाजीनगरकडे जाणाऱ्या पुलाच्या विरुद्ध बाजूच्या गल्लीत, लोअर इंदिरानगर, बिबवेवाडी येथे, सार्वजनिक रस्त्यावर गप्पा मारत उभे होते. तेव्हा चार जणांचे टोळके तेथे आले. पूर्वी झालेल्या भांडणाच्या कारणावरून त्यांनी फिर्यादीवर सिमेंटचा ब्लॉक मारून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या डोक्यात सिमेंटचा ब्लॉक मारल्यामुळे गंभीर दुखापत झाली, आणि ते पळून गेले. पोलिसांनी अद्याप कोणालाही अटक केलेली नाही.

सहायक पोलीस निरीक्षक संजय निकुंभ तपास करीत आहेत.

## निवडणूक खर्च निरीक्षकांची माध्यम कक्षाला भेट

पुणे जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांसाठी नियुक्त निवडणूक खर्च निरीक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या माध्यम संनियंत्रण व जनसंपर्क कक्षाला भेट देऊन कामकाजाची माहिती घेतली.

विविध विधानसभा मतदारसंघांसाठी निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सुमीत कुमार, प्रेम प्रकाश मीना, उमेश कुमार, अमीत कुमार आणि ए.वेंकादेश बाबू यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी दिलेल्या भेटीप्रसंगी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुहास दिवसे, पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर, जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्ष समन्वय अधिकारी डॉ. रवींद्र ठाकूर, सहायक संचालक जयंत कर्पे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्र विद्या विभागाचे सहायक प्राध्यापक योगेश बोराटे उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी माध्यम कक्षाच्या कामकाजाविषयी माहिती दिली. माध्यम कक्षात सुमारे १० दूरचित्रवाणी संचांच्या माध्यमातून वृत्तवाहिन्यांतील निवडणूक प्रचार, जाहिरात, पेड न्यूज आदींच्या अनुषंगाने संनियंत्रण केले जात आहे. तसेच वृत्तपत्रातील बातम्या, मजकूर, तसेच सोशल मीडियावरील पोस्टबाबतही काटेकोर लक्ष ठेवण्यात येत असून आवश्यक प्रकरणात कारवाई करण्यात येते, असे डॉ. दिवसे म्हणाले.

डॉ. ठाकूर यांनी माध्यम कक्षातर्फे तयार करण्यात येणाऱ्या विविध अहवालांची माहिती दिली. वृत्तपत्रातील जाहिराती आणि पेड न्यूजबाबतही वृत्तपत्रांचे अवलोकन केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. सहायक प्राध्यापक बोराटे यांनी सोशल मिडीयाद्वारे करण्यात येणाऱ्या प्रचारावर तसेच सोशल मीडियावरील जाहिराती व त्याचा खर्च यावर माध्यम कक्षातर्फे ठेवण्यात येणाऱ्या नियंत्रणाच्या कामकाजाची माहिती दिली.

निवडणूक खर्च निरीक्षक सुमीत कुमार यांच्याकडे २००- इंदापूर, २०१-बारामती, २०२-पुरंदर व २०३-भोर विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे. मीना यांच्याकडे २०४-मावळ, २०५-चिंचवड, २०६-पिंपरी, २०७-भोसरी मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे. उमेश कुमार यांच्याकडे २१२-पर्वती, २१३-हडपसर, २१४-पुणे कँन्टोन्मेंट व २१५-कसबा पेठ मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे. अमीत कुमार यांच्याकडे २०८-वडगांव शेरी, २०९-शिवाजीनगर, २१०-कोथरुड व २११-खडकवासला मतदारसंघाची, तर बाबू यांच्याकडे १९५-जुन्नर, १९६-आंबेगाव, १९७-खेड आळंदी, १९८-शिरूर व १९९-दौंड मतदारसंघाची जबाबदारी देण्यात आली आहे.

## खडकवासलासाठी निवडणूक खर्च निरीक्षकांची नियुक्ती

जिल्ह्यातील २११-खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाकडून निवडणूक निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून अमित कुमार यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. यशवंत माने यांनी दिली आहे.

अमित कुमार यांचा निवासाचा पत्ता व्हीव्हीआयपी विश्रामगृह, पुणे येथील कक्ष क्रमांक ए-१०४ असा असून संपर्क क्रमांक ८४३२५२०२४४ असा आहे. निवडणूक खर्च निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी मनीष जाधव हे असून त्यांचा संपर्क क्रमांक ९३०७८०८४८९ असा आहे. अमित कुमार सकाळी १० ते १२ या वेळेत व्हीव्हीआयपी विश्रामगृह, पुणे या ठिकाणी भेटतील.

## हडपसरसाठी उमेश कुमार निवडणूक खर्च निरीक्षकपदी

जिल्ह्यातील २१३-हडपसर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाकडून निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून उमेश कुमार यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती हडपसर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. स्वप्नील मोरे यांनी दिली आहे.

उमेश कुमार यांचा निवासाचा पत्ता- खोली क्रमांक ए- १०५ , हरित इमारत, व्हीव्हीआयपी विश्रामगृह, क्वीन्स गार्डन, पुणे असा आहे. त्यांचा संपर्क क्रमांक ७७६८०३६२३० हा आहे. त्यांचा ई-मेल आयडी umeshnoba@gov.in आहे. त्यांचे संपर्क अधिकारी सुहास विसपुते (९०११०२७१८७) हे आहेत.

## खडकवासलावर निवडणूक आयोगाची करडी नजर

खडकवासला विधानसभा मतदारसंघात निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी स्थिर सर्वेक्षण पथक, भरारी पथक, व्हिडीओ सर्वेक्षण पथक, व्हिडीयो पाहणी पथक स्थापन करण्यात आली असून निवडणूक विषयक कोणत्याही बाबींचा भंग होऊ नये यासाठी या पथकांद्वारे मतदारसंघातील विविध भागांत बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. यशवंत माने यांनी दिली.

सिंहगड टेक्निकल इन्स्टिट्यूट, आंबेगाव येथील आयोजित सर्व पथकांच्या बैठकीत माने बोलत होते. यावेळी विविध पथकातील समन्वय अधिकाऱ्यांसह पथकातील इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या हद्दीत प्रवेश करणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करण्यात यावी, तसेच इतर संशयीत वाहनांवरदेखील लक्ष ठेवून तपासणी करावी, वाहनांमध्ये ५० हजारांपेक्षा अधिक रक्कम सापडल्यास तसेच १० हजारांवरील मद्य,भेटवस्तू, अंमली पदार्थ, पोस्टर्स, इतर निवडणुक साहित्य वाटप करण्याच्या उद्देशाने उमेदवार, प्रतिनिधी किंवा कार्यकर्ते सापडल्यास सर्व साहित्य जप्त करण्यात यावे, १० लाखांपेक्षा अधिक रक्कम सापडल्यास तात्काळ आयकर विभागाला कळवावे, असे सांगून दिलेली जबाबदारी पार पाडताना कोणताही हलगर्जीपणा करू नये, कोणताही गैरप्रकार आढळल्यास भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे योग्य ती कारवाई करण्यात येईल, असा इशारा डॉ. माने यांनी दिला.

खडकवासला विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी ९ भरारी पथके (एफएसटी), स्थिर सर्वेक्षण पथके (एसएसटी), ३ व्हिडीयो सर्वेक्षण पथके (व्हीएसटी) स्थापन करण्यात आली आहेत. वडगाव बुद्रुक ब्रिज खाली, भुसारी कॉलनी जैन आय टी पार्क, गेट क्र. १० एनडीए आणि खेड शिवापुर टोल नाका अशा चार ठिकाणी स्थिर सर्वेक्षण पथके कार्यान्वित करण्यात आली आहेत. आजअखेर पर्यंत 'सी - व्हिजिल' ॲपच्या माध्यमातून एकूण ८ ऑनलाईन तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे, अशी माहिती खडकवासला विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली.

## कोथरूड विधानसभा निवडणुकीसाठी खर्च निरीक्षकांची नियुक्ती

कोथरूड विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाकडून निवडणूक निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून अमित कुमार यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती कोथरूड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी सुनील गाढे यांनी दिली आहे. अमित कुमार यांचा निवासाचा पत्ता- व्हीव्हीआयपी विश्रामगृह, पुणे येथील कक्ष क्रमांक ए-१०४ असा असून संपर्क क्रमांक ८४३२५२०२४४ असा आहे. निवडणूक खर्च निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी मनीष जाधव हे असून त्यांचा संपर्क क्रमांक ९३०७८०८४८९ असा आहे. अमित कुमार सकाळी १० ते १२ या वेळेत व्हीव्हीआयपी विश्रामगृह, पुणे या ठिकाणी भेटतील, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी गाढे यांनी दिली आहे.

## पर्वती विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक खर्च निरीक्षकांची नियुक्ती

पर्वती विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाकडून निवडणूक निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून उमेश कुमार यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती पर्वती विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी मनोजकुमार खैरनार यांनी दिली.

उमेश कुमार यांचा निवासाचा पत्ता व्हीव्हीआयपी विश्रामगृह, पुणे येथील कक्ष क्रमांक ए-१०५ असा असून त्यांचा संपर्क क्रमांक ७७६८०३६२३० असा आहे. त्यांना व्हीव्हीआयपी विश्रामगृह, पुणे येथे भेटण्याची वेळ दुपारी ३.३० वाजेपासून ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत आहे. निवडणूक खर्च निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी सुहास विसपुते हे असून त्यांचा संपर्क क्रमांक ९०११०२७१८७ असा आहे. मतदारसंघातील काही तक्रारी असल्यास निवारणाकरिता सी-व्हिजिल ॲप, तसेच ०२०- २९९५२१३४ या हेल्पडेस्कवर नोंदविण्याचे आवाहन पर्वती विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

## जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण आवश्यक

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती (मीडिया सर्टीफीकेशन ॲण्ड मॉनिटरिंग कमिटी) गठित करण्यात आली आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने निवडणूक प्रचाराच्या जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण या समितीकडून करून घेणे आवश्यक आहे, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच समितीचे अध्यक्ष डॉ. सुहास दिवसे यांनी कळविले आहे. उमेदवारांमार्फत प्रचारासाठी इलेक्ट्रॉनिक, समाज माध्यमे (सोशल मीडिया) तसेच फिरत्या एलईडी व्हॅन, ऑटो रिक्षा आदी बाह्यमाध्यमांवरून देण्यात येणाऱ्या श्राव्य (ऑडिओ), दृकश्राव्य (ऑडिओ-व्हीज्युअल) जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण या समितीमार्फत केले जाते. माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समितीचे कामकाज जिल्हा माहिती कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला, ससून रुग्णालयासमोर, पुणे-४११००१ येथून चालणार असून दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२१३०७ असा आहे.

## माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीचे कामकाज

टीव्ही चॅनेल, रेडिओ, एफएम, सिनेमागृह, सोशल मिडीया, एसएमएस, दूरध्वनीवरील रेकॉर्डेड व्हॉईस कॉलद्वारे करण्यात येणाऱ्या प्रचाराच्या जाहिराती (आऊटबाऊंड डायलिंग ओबीडी), वृत्तपत्रांच्या ई-आवृत्तीतील जाहिराती, सार्वजनिक ठिकाणी दाखवायच्या दृक-श्राव्य जाहिरातींसाठी प्रसारणपूर्व प्रमाणपत्र बंधनकारक आहे.

त्यासाठी उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी विहीत नमुन्यातील इंग्रजी किंवा मराठी भाषेतील अर्ज दोन प्रतींमध्ये आवश्यक माहिती भरुन सादर करण्यात यावा. अर्जासोबत दोन सीडी/पेनड्राईव्ह (सीडीमधील गीत, संवाद, घोषणा यांच्या टंकलिखीत मजकुराच्या दोन प्रती - ट्रान्सस्क्रीप्ट) सादर करणे आवश्यक आहे. प्रत्येक ऑडिओ जाहिरात किंवा ऑडिओ-व्हीज्युअल जाहिरात ही स्वतंत्र असावी. एकाच सीडी, पेनड्राईव्हमध्ये एकापेक्षा अधिक जाहिराती असू नयेत. अर्जदाराचे पूर्ण नाव, पत्ता, जाहिरात कोणत्या उमेदवारासाठी आहे. त्याचे नाव, पक्षाचे नाव, जाहिरात कुठे दाखवणार, जाहिरातीचे शीर्षक, जाहिरात निर्मितीचा खर्च, जाहिरातीतील भाषा याचा स्पष्ट उल्लेख असावा. सीडीमधील मजकूर प्रसारण योग्य असावा. इतरांची बदनामी करणारा, जाती-जातींमध्ये, धार्मिक तेढ निर्माण करणारा नसावा. देशविघातक कृत्याला प्रोत्साहन देणारा नसावा.



# दुहेरी हत्याकांडामधील अडीच वर्षांपासून फरार आरोपी जेरबंद

## युनिट 6 गुन्हे शाखा पोलिसांची कामगिरी

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : दुहेरी हत्याकांडातील अडीच वर्षांपासून फरार असलेला आरोपी जेरबंद करण्यात युनिट ६ गुन्हे शाखा पोलीस पथकाला यश आले आहे.**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुशंगाने फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, दि. २२ ऑक्टोबर २०२४ रोजी गुन्हे शाखा युनिट ६ मधील अधिकारी व अंमलदार गस्त घालत होते. त्यावेळी पोलीस उपनिरीक्षक दळवी, पोलीस अंमलदार ताकवणे, व्यवहारे, पवार यांना गोपनीय माहिती मिळाली की लोणीकंद पोलीस स्टेशनमध्ये दाखल गुन्ह्यातील अडीच वर्षांपासून फरार असलेला आरोपी ऋग्वेद जालिंदर वाळके (वय २३ वर्षे) हा पेरणे टोलनाका शेजारी सागर हॉटेलजवळ येणार आहे.

पोलीस पथकाने तेथे सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले आहे. सदर आरोपीविरुद्ध यापूर्वी खून, गंभीर दुखापत, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे इत्यादी गुन्हे दाखल आहेत.

ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाहिद पठाण, सहायक पोलीस निरीक्षक मदन कांबळे, उपनिरीक्षक दळवी, पोलीस अंमलदार सकटे, मेमाणे, मुंढे, कारखेले, ताकवणे, व्यवहारे, पवार, काटे, धाडगे, तनपुरे, महिला पोलीस अंमलदार पानसरे, मांदळे यांनी केली आहे.

# मोबाईल चोरी करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी केला पर्दाफाश

## खराडी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : मोबाईल चोरी करणाऱ्या टोळीचा खराडी पोलिसांनी पर्दाफाश केला असून चार जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याकडून २.२५ लाख रुपयांचे १४ मोबाईल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कात्रजचा एक तरुण १८ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत न्यू इंग्लिश फिनिक्स स्कूलच्या समोरील मैदानात, खराडी, पुणे येथे इव्हेंट (शो) पाहण्यासाठी गेला होता. तसेच त्या इव्हेंटला मोठ्या प्रमाणात प्रेक्षकांची गर्दी जमली होती. त्यावेळी चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेत फिर्यादीच्या खिशातील मोबाईल फोन आणि इव्हेंटसाठी जमलेल्या इतर प्रेक्षकांचे मोबाईलही चोरले. चंदननगर पोलिस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास खराडी पोलिस ठाण्यातील तपास पथकाचे अधिकारी, पोलिस उपनिरीक्षक राहुल कोळपे आणि त्यांचे सहकारी करत होते. फोनचा शोध घेत असताना, शेखर शिंदे, अमोल जाधव, आणि श्रीकांत कोद्रे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की संशयित आरोपी स्विट इंडिया चौक, खराडी, पुणे येथे आहेत. मिळालेल्या माहितीवरून तपास पथकाचे अधिकारी पो.उ.नि. राहुल कोळपे, पोलिस हवालदार महेश नाणेकर, अमंलदार सचिन पाटील, प्रफुल्ल मोरे, अमोल जाधव, शेखर शिंदे, श्रीकांत कोद्रे, सूरज जाधव या पथकाने कारवाई केली. तिथे संशयित आरोपी (१) अखिल व्यंकटरमण गोदावरी (वय २४, रा. फलकनामा, रंगारेड्डी जिल्हा, हैद्राबाद), (२) सय्यद महमद इद्रीस शेख (वय २१, रा. मिलनसार सोसायटी, १२ बिल्डिंग जवळ, एस.आर.ए., परमान खार रोड, मुंबई), (३) लोकेश हनुमंत पुजारी (वय ३१, रा. घोरपडी गाव, बी.टी. कवडे रोड, शिवदत्त कॉलनी, पुणे) आणि (४) पप्पू भागीरथी वैश्य (वय ३४, रा. शांतीलाल कंपाऊंड, जवाहरनगर, खार ईस्ट, मुंबई) यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून विविध कंपन्यांचे एकूण २.३० लाख रुपयांचे १४ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत.

इव्हेंट आणि गर्दीच्या ठिकाणी मोबाईल चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करून खराडी पोलिसांनी या टोळीला अटक केली आहे. या कारवाईत वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय चव्हाण, तपास पथक प्रभारी अधिकारी पोउनि राहुल कोळपे, आणि पोलिस अंमलदार महेश नाणेकर, सचिन पाटील, प्रफुल मोरे, अमोल जाधव, शेखर शिंदे, श्रीकांत कोद्रे, सूरज जाधव यांनी केली आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात सात शेळ्यांचा मृत्यू

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : बंदिस्त कुंपणाच्या गोठ्यातील माती उकरून बिबट्याने गोठ्यातील शेळ्यांवर हल्ला करून सात शेळ्या ठार केल्याची घटना देवगाव (ता. आंबेगाव) येथे सोमवारी मध्यरात्री घडली.**



तालुक्याच्या पूर्व भागातील देवगावच्या शिववस्ती येथील शारदा शिवराम वाळुंज यांच्या घराजवळील गोठ्यात सात शेळ्या बांधल्या होत्या. शारदा व त्यांचे पती शिवराम या ठिकाणी राहतात. मंगळवारी सकाळी सहाच्या सुमारास शारदा वाळुंज गोठ्याकडे गेल्या असता गोठ्यात सर्वत्र रक्त दिसले आणि चार गाभण शेळ्या मृतावस्थेत आणि एक जखमी अवस्थेत आढळली. काही वेळाने जखमी शेळीचाही मृत्यू झाला. याशिवाय दोन शेळ्या बिबट्याने शेजारील उसाच्या शेतात नेऊन फस्त केल्याचे दिसून आले.

या घटनेत शारदा वाळुंज यांचे अंदाजे एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी गोठ्याकडे घेतली, असे नवनाथ आरगडे यांनी सांगितले. वन विभागाच्या कर्मचारी साईमाला गीते यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. देवगावमध्ये बिबट्याचे अनेक दिवस वास्तव्य असून, शिववस्ती, झाप वस्ती, लाखनगाव, देवगाव केदारकडा, पोंदेवस्ती परिसरातील शेतकऱ्यांच्या लहान-मोठ्या जनावरांवर बिबट्याने हल्ले केले आहेत. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. ग्रामस्थांनी वन विभागाकडे पिंजरा लावण्याची मागणी केली आहे. परंतु, अनेक दिवस मंचर वन परिक्षेत्राला वन परिक्षेत्र अधिकारी नसल्याने कोणाकडे तक्रार करावी, असा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे. बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनेनंतर पंचनामे विलंबाने होत आहेत.

या घटनांमध्ये नुकसान भरपाईदेखील उशिराने मिळत असून, काही प्रकरणांत भरपाई मिळत नसल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी केल्या आहेत. जुन्नर, आंबेगाव या तालुक्यांत बिबट्यांचा वावर वाढला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करण्याची मागणी सातत्याने सरकारकडे करण्यात येत आहे.

# रात्र गस्त घालत असताना मार्शलवर हल्ला

## डेक्कन पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पुणे शहरात रात्र गस्त घालत असताना एका चोरट्याने पोलीस मार्शलवर जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डेक्कन पोलीस ठाण्यात काम करणारे पोलीस हवालदार महेश तांबे यांनी फिर्याद दिली आहे. दि. २२ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री २:३० वाजण्याच्या सुमारास अभिनव विद्यालय पथ, जानकी व्हिला बंगल्याजवळील रस्त्यावर, एरंडवणे, पुणे येथे ही घटना घडली.

फिर्यादी तांबे आपल्या साथीदार सातव यांच्यासह मार्शल ड्युटी पेट्रोलिंग करत असताना त्यांना सहा जणांचे टोळके दिसले. धारदार शस्त्रांसह गंभीर स्वरूपाचा दरोडा टाकण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या या टोळक्याला अडवण्याचा प्रयत्न केला असता, त्या चोरट्यांनी संगनमताने फिर्यादींच्या हातावर धारदार शस्त्राने वार केला. फिर्यादी शासकीय काम करत असताना त्यांना कामात अडथळा निर्माण करून जखमी केले व झटापट करून अंधाराचा फायदा घेत त्यांच्या दोन दुचाकींसह चोरटे पळून गेले. पोलीस उपनिरीक्षक महेश भोसले तपास करीत आहेत.

# टोळक्याची दहशत, तरुणावर जीवघेणा हल्ला

## वारजे माळवाडी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : मित्राला मारल्याच्या कारणावरून एका टोळक्याने दोघांवर लोखंडी धारदार शस्त्राने हल्ला करून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना कर्वेनगर येथे घडली आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सिंहगड रोडवर राहणाऱ्या एका तरुणाने फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

दि. २१ ऑक्टोबर रोजी रात्री साडे अकराच्या सुमारास ही घटना घडली. चंद्रलोक बियर बार गार्डन, कर्वेनगर येथे फिर्यादी तरुण व त्याचे इतर तीन मित्र होते.

त्यावेळी तिथे आलेल्या तीन इसमांनी आणि त्यांच्या साथीदारांनी, मित्राला मारल्याच्या कारणावरून लोखंडी शस्त्राने हल्ला करून फिर्यादीला गंभीर जखमी केले आणि परिसरात दहशत निर्माण केली.

पोलीस निरीक्षक नीलेश बडाख या प्रकरणाचा तपास करीत आहेत.



# दरोड्याच्या गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक

## दरोडा व वाहनचोरी विरोधी पथकाची कामगिरी

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : अंभोरा पोलीस स्टेशन (जि. बीड) आणि पाथर्डी पोलीस स्टेशन (जि. अहमदनगर) येथील गुन्ह्यांमध्ये दीड महिन्यांपासून फरार असलेले दोन आरोपी आणि एक विधीसंघर्षग्रस्त बालक यांना अटक करण्यात पोलीस पथकाला यश आले आहे.**

आगामी विधानसभा २०२४ च्या पार्श्वभूमीवर दरोडा आणि वाहनचोरी विरोधी पथक १ चे पोलीस अधिकारी आणि अंमलदार गस्त घालत असताना पोलीस अंमलदार साईकुमार कारके यांना त्यांच्या गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, अंभोरा पोलीस स्टेशन (जि. बीड) येथील गुन्ह्यातील आरोपी आणि एक विधीसंघर्षग्रस्त बालक सार्वजनिक रस्त्यावर उभे आहेत. माहिती मिळाल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार बिडवई यांना माहिती कळविण्यात आली. त्यांनी आरोपींना ताब्यात घेऊन कारवाई करण्याचे आदेश दिले.

पोलीस उप निरीक्षक शाहीद शेख आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी जाऊन आरोपींना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेले आरोपी पुढीलप्रमाणे आहेत: १) रोहित गुरुदत्त वाघमारे, वय २९ वर्षे, (रा. मुळगाव माळीचिंचोरा, ता. नेवासा, जि. अहमदनगर, सध्या रा. यशोदिप चौक, चौधरी बिल्डिंग, वारजे माळवाडी, पुणे), २) शुभम चांगदेव धनवटे, वय २० वर्षे, ( रा. मुळगाव- वडाळा महादेव, पाण्याच्या टाकीजवळ, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर) आणि एक विधीसंघर्षग्रस्त बालक आरोपींना पुढील कारवाईसाठी अंभोरा पोलीस स्टेशनच्या (जि. बीड) ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार बिडवई यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण काळुखे, पोलीस उप निरीक्षक शाहीद शेख, धनंजय ताजणे, गणेश ढगे, बाळु गायकवाड, प्रदीप राठोड, अजित शिंदे, इरफान पठाण, दत्तात्रय पवार, मनिषा पुकाळे, रविंद्र लोखंडे, साईकुमार कारके, महेश पाटील, श्रीकांत दगडे, अमित गद्रे, शिवाजी सातपुते, अक्षय गायकवाड, नारायण बनकर, दरोडा आणि वाहनचोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर यांनी केली.

# हायवेवरील टेम्पोची चोरी करणारा जेरबंद

## भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : हायवेवरील टेम्पो चोरी करणाऱ्या सराईत आरोपीला जेरबंद करण्यात भारती विद्यापीठ पोलीसांना यश आले आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १४ ऑक्टोबर रोजी नवले ब्रिजकडून कात्रज चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर, राजमाता उद्यानाच्या शेजारी फिर्यादींनी त्यांचा टेम्पो लॉक करून पार्क केला होता. तो कोणीतरी चोरून नेला, अशी फिर्यादींनी तक्रार दिल्यावर भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी. एस. पाटील यांनी पोलीस पथकाला सूचना देऊन योग्य ते मार्गदर्शन केले. तपास पथकातील अधिकारी अंमलदार महेश बारवकर, सचिन गाडे हे शोध घेत होते. त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, हा टेम्पो हा रेकॉर्डवरील आरोपी प्रशांत दिगंबर पाटील (वय ४० वर्षे, रा. कृष्णा वॉटर पार्क, सिंहगड रोड, सुभेदार हॉटेलजवळ, मूळ रा. जि. छत्रपती संभाजीनगर) याने चोरला असून, तो टेम्पो घेऊन नाशिक येथे जात आहे. त्यानुसार पोलीस अंमलदार महेश बारवकर आणि सचिन गाडे यांनी नाशिक येथे जाऊन मिळालेल्या माहितीनुसार चोरी गेलेला टेम्पो ताब्यात घेतला आणि आरोपीला अटक केली

सदर कामगिरी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी. एस. पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद झिने, तपास पथकाचे अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक समीर कदम, पोलीस उपनिरीक्षक नीलेश मोकाशी, तसेच पोलीस अंमलदार महेश बारवकर, सचिन गाडे, धनाजी धोत्रे, सचिन सरपाले, नामदेव रेणुसे, चेतन गोरे, मंगेश पवार, सतीश मोरे, नवनाथ भोसले, निलेश खैरमोडे, मितेश चोरमाले, सागर बोरगे आणि अभिनय चौधरी यांच्या पथकाने केली आहे.

# चोरट्यांकडुन 4 दुचाकी व 6 मोबाईल जप्त

## समर्थ पोलीस स्टेशनची कामगिरी

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : समर्थ पोलिसांना चोरट्यांकडून ४ दुचाकी आणि ६ मोबाईल जप्त करण्यात यश आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, समर्थ पोलीस स्टेशनमध्ये दाखल गुन्ह्यात फिर्यादी यांनी त्यांच्या घरासमोर पार्क केलेली मोटारसायकल चोरीला गेल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



समर्थ पोलीस स्टेशनचे अधिकारी आणि अमलदार दाखल गुन्ह्यातील चोरी गेलेले वाहन तसेच चोरट्यांचा शोध घेत असताना, पोलीस अमलदार शेख, गावडे, घोरपडे यांनी घटनास्थळ आणि आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तसेच गुप्त माहितीच्या मदतीने तपास पथकातील पोलीस अमलदारांनी चोरी गेलेल्या वाहनाचा शोध घेतला. सारस्वत कॉलनी परिसरात ते आले असता, तेथे दोन इसम दोन दुचाकींवरून पळून जाण्याचा प्रयत्न करताना आढळले. या इसमांचा पाठलाग करून त्यांना थांबवून त्यांच्या ताब्यातील दुचाकी वाहनांबाबत विचारपूस केली असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यांना दुचाकीसह ताब्यात घेण्यात आले आणि समर्थ पोलीस स्टेशनमध्ये आणले. पुढील चौकशीत त्यांनी इतर साथीदार सुशांत ऊर्फ बंटी बाबुराव शिंदे व एक विधी संघर्षित बालक यांच्या मदतीने दुचाकी वाहनांची चोरी केल्याचे उघड झाले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची माहिती खालीलप्रमाणे आहे : १) अविनाश पप्पू अडसुळे (वय १८ वर्षे ८ महिने), (रा. कोल्हापुरकर यांची खोली, यशोदीप चौकाजवळ, वारजे माळवाडी, पुणे), २) सुशांत ऊर्फ बंटी बाबुराव शिंदे (वय १८ वर्षे ४ महिने), (रा. यशोदीप चौकाजवळ, वारजे माळवाडी, पुणे).

आरोपींनी दोन विधी संघर्षित बालकांसह वारजे माळवाडी परिसरात तसेच समर्थ पोलीस स्टेशनच्या हद्दीतून आणखी काही दुचाकी वाहने आणि मोबाईल फोन चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यांच्याकडून ४ दुचाकी वाहने, ६ मोबाईल फोन, १ कॉलेज बॅग व पाकीट आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली. यामध्ये वारजे माळवाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीतून १ वाहन चोरीचा गुन्हा तसेच समर्थ पोलीस स्टेशनच्या हद्दीतून ३ वाहन चोरीचे गुन्हे उघड झाले आहेत.

सदरची कामगिरी समर्थ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक जालिंदर फडतरे, सहाय्यक पोलीस फौजदार पागार, पोलीस अमलदार इम्रान शेख, रोहीदास वाघेरे, रविंद्र औचरे, शिवा कांबळे, अमोल गावडे, रहीम शेख, शरद घोरपडे, अर्जुन कुडाळकर यांनी ही कामगिरी बजावली.

# तोतया अधिकाऱ्याने घातला गंडा

## बावधन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : केंद्रीय अन्वेषण विभागाचा (सीबीआय) अधिकारी असल्याचे सांगून एका व्यावसायिकाला व्यावसायिकाला सीबीआयच्या नावाने धमकावले व १२ लाख रुपयांचा गंडा घातल्याची घटना मंगळवार (२२ ऑक्टोबर) ते गुरुवार (२४ ऑक्टोबर) या कालावधीत घडली आहे.**




पोलिसानी दिलेल्या माहितीनुसार सुहास अशोकराव वानखडे (वय ४०, रा. बावधन) यांनी या प्रकरणी बावधन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार, विनोद आण्णाप्पाथोरवत (वय ३९, रा. गिजवणे, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वानखडे यांची बावधन येथे सेफ्टेक्नो सर्व्हिसेस कंपनी आहे. संशयित आरोपीने तिथे येऊन, त्यांना सीबीआयमधून आल्याचे सांगितले; तसेच सीबीआयचे बनावट ओळखपत्र दाखवले. सीबीआयचा अधिकारी असून, तुमची फाइल माझ्याकडे तपासणीसाठी आल्याची खोटी माहिती सांगितली.

आरोपीने धमकी देऊन, फिर्यादी यांच्याकडून १२ लाख रुपयांची मागणी केली. ते पैसे घेऊन, तोतया सीबीआय अधिकाऱ्याने पोबारा केला. या प्रकरणी वानखडे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. बावधन पोलिस तपास करीत आहेत.

# महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**Maharashtra News Network**

सोमवार, २१ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर २०२४





RNI NO. MAHMAR/2023/88387 TC No.MAHMAR52531

From : Office No. 301, Tulsi Apts., Near Mahavir Park, Swami Samarth Nagar, Kakde Wasti, Kondhwa BK., Pune - 411 048.

To,

Book Post


# प्रियांका गांधी उतरल्या सक्रिय राजकारणात

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**वायनाड (केरळ) : काँग्रेसच्या सरचिटणीसपदावर काम करत, पक्षातील अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर प्रियांका गांधी-वद्रा यांनी बुधवारी (दि. २३) खऱ्या अर्थाने सक्रिय राजकारणात पदार्पण केले. त्यांनी वायनाड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. १३ नोव्हेंबर रोजी या जागेसाठी मतदान होणार आहे.**



उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी प्रियांका गांधी यांनी कलपेट्टा येथे एका सभेला संबोधित केले. 'वायनाडमधील नागरिकांचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे हा माझा सन्मान आहे. जिल्ह्यात झालेल्या भूस्खलनावेळी स्थानिकांनी दाखवलेल्या धाडसाने मी खूप प्रभावित झाले होते,' असे त्या म्हणाल्या. उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी प्रियांका गांधी-वद्रा यांनी वायनाडमधील कलपेट्टा येथे 'रोड शो'देखील केला. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, विरोधी पक्षनेते राहुल गांधी, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि पक्षाचे इतर वरिष्ठ नेते या प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते. राहुल गांधी यांनीही सभेला संबोधित केले.

'माझी बहीण निवडून आल्यानंतर वायनाडचे प्रतिनिधित्व करण्यासाठी एक अधिकृत आणि एक अनौपचारिक असे दोन खासदार असतील. दोघेही वायनाडच्या नागरिकांच्या हितासाठी एकत्र काम करतील,' असे राहुल गांधी यांनी नमूद केले.

'माझ्या हातात असलेली राखी माझ्या बहिणीने स्वतः बनवली आहे. ती तुटेपर्यंत मी ती काढत नाही. ही राखी भावाकडून बहिणीच्या संरक्षणाचे प्रतीक आहे. म्हणूनच मी वायनाडच्या लोकांना विनंती करतो की त्यांनी माझ्या बहिणीची काळजी घ्यावी आणि तिचे रक्षण करावे. ती आपली संपूर्ण शक्ती वायनाडच्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी आणि तुमचे रक्षण करण्यासाठी लावेल,' असेही राहुल गांधी म्हणाले. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनीही वायनाडवासीयांना प्रियांका गांधी यांना निवडून आणण्याचे आवाहन केले.

# पावसाचा फटका, टोमॅटोने गाठली 'शंभरी'

## आवक निम्म्याने घटली : पंधरा दिवस दर कायम राहणार

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पुणे विभागातील टोमॅटो पिकाला पावसाचा फटका बसल्याने नेहमीच्या तुलनेत आवक निम्म्याने घटली आहे, ज्यामुळे घाऊक आणि किरकोळ बाजारातील दरात वाढ झाली आहे.**



किरकोळ बाजारात टोमॅटोचे दर प्रतिकिलोसाठी 120 रुपये झाले आहेत. हे दर पुढील पंधरा दिवस कायम राहतील, असा अंदाज आहे. जास्त पावसामुळे टोमॅटोचे नुकसान झाले असून, अनेक ठिकाणी शेतात पाणी साचल्याने नवीन लागवड करता आलेली नाही.

त्यामुळे नवीन पीक येण्यास वेळ लागणार आहे. आवक कमी होत असल्याने दरांत वाढ होत आहे. मार्केट यार्डातील भाजीपाला विभागात रोज सहा ते सात हजार क्रेट टोमॅटो येत आहेत. पावसामुळे टोमॅटोचे नुकसान झाले असून, टोमॅटो हे पीक वर्षभर येते, परंतु यावेळी पावसामुळे नवीन पीक येण्यास विलंब लागणार आहे.

त्यामुळे बाजारात आवक घटल्याने आणखी काही दिवस दर टिकून राहतील, अशी माहिती ज्येष्ठ आडते विलास भुजबळ, मार्केट यार्ड यांनी दिली.

# दिवाळीत जादा तिकीट घेणाऱ्या ट्रॅव्हल्सवर कारवाईचा बडगा

## आरटीओकडून तपासणी मोहीम सुरू

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : पुणे प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) दिवाळी सणाच्या काळात जादा तिकीट घेणाऱ्या खासगी ट्रॅव्हल्सची तपासणी मोहीम सुरू केली आहे. त्यासाठी चार पथकांची नेमणूक केली असून, ट्रॅव्हल्स सुटणाऱ्या ठिकाणी आणि बुकिंगच्या ठिकाणी नऊ नोव्हेंबरपर्यंत ही मोहीम सुरू राहणार आहे. सध्या दिवाळीसाठी गावी जाताना दुप्पट दर आकारले जात आहेत.**

आरक्षणामुळे रेल्वे फुल्ल असते. एसटीला दिवाळीला गावी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असते. रेल्वेचे बुकिंग फुल्ल झाले आहे असून, एसटीलादेखील मोठी गर्दी आहे. त्यामुळे नागरिकांना केवळ खासगी ट्रॅव्हल्स हा पर्याय शिल्लक आहे. मात्र, ट्रॅव्हल्सवाल्यांनी तिकिटामध्ये दुप्पट केले आहेत.

प्रवाशांनी या दर वाढ विरोधात आवाज उठवला त्यामुळे



आरटीओने जादा तिकिट घेणाऱ्या ट्रॅव्हल्सची तपासणी सुरू केली आहे. यासाठी चार पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. ही पथके पाच नोव्हेंबरपर्यंत तपासणी करणार आहेत. 'ट्रॅव्हल्सवाले एसटीपेक्षा दीडपट तिकीट घेऊ शकतात; पण त्यापेक्षा जास्त तिकीट घेतल्याचे आढळल्यास कारवाई करण्यात येणार आहे. खासगी ट्रॅव्हल्स चालकांकडून जादा तिकीट घेतल्यासंदर्भात तपासणी सुरू करण्यात आली आहे.

ट्रॅव्हल्स सुटतात तेथे व बुकिंगच्या ठिकाणी तपासणी केली जाईल. दोषी आढळल्यास कारवाई केली जाणार आहे, अशी माहिती स्वप्नील भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी दिली आहे. रिक्षा, कॅब आणि खासगी ट्रॅव्हल्स यांच्या विरोधात तक्रार करण्यासाठी पुणे प्रादेशिक परिवहन विभागाने (आरटीओ) ८२७५३३०१०१ हा व्हॉट्सॲप क्रमांक सुरू केला आहे. खासगी ट्रॅव्हल्स चालकांकडून जास्त तिकीट आकारले जात असल्यास नागरिकांनी या क्रमांकावर तक्रार करावी;असे सांगण्यात आले आहे.

बसची सर्व कागदपत्रे व्यवस्थित असल्याची खात्री करावी; अन्यथा त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे,' असा इशारा आरटीओकडून देण्यात आला आहे. आरटीओने पुण्यातून ४७ शहरांसाठी एसटी बसला किती दर घेतला जातो, याचे दरपत्रक जाहीर केले आहे. मात्र, सध्या तरी विषयी माहिती पुस्तक किंवा ट्रॅव्हल्सचे ऑनलाइन दर दुप्पट दिसत आहेत. पुण्यातून नागपूरसाठी जास्तीत जास्त दर साधरणतः २८०० रुपये आहे; पण सध्या तिकीटदर चार हजार रुपयांपर्यंत गेले आहेत. त्यामुळे आरटीओने ऑनलाइन दर पाहून कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

# देशात गोदामांच्या संख्येत वाढ; पुण्याचा मोठा वाटा

महाराष्ट्र न्युज नेटवर्क

**पुणे : जागतिक उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून देशाची ओळख निर्माण होत आहे. परिणामी, देशांतर्गत गोदामांच्या मागणीत वाढ होत आहे. चालू वर्षातील पहिल्या सहामाहीत गोदामांची मागणी वाढली असून, त्यात पुण्याचा मोठा वाटा आहे. 'क्रेडाई' आणि 'सीआरई मॅट्रिक्स' यांच्या देशव्यापी अभ्यासातून ही बाब समोर आली आहे.**

जागतिक उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून देशाची ओळख निर्माण होत आहे. परिणामी, देशांतर्गत गोदामांच्या मागणीत वाढ होत आहे. चालू वर्षातील पहिल्या सहामाहीत गोदामांची मागणी वाढली असून, त्यात पुण्याचा मोठा वाटा आहे. 'क्रेडाई' आणि 'सीआरई मॅट्रिक्स' यांच्या देशव्यापी अभ्यासातून ही बाब समोर आली आहे.

देशात 'ए' आणि 'ए प्लस' श्रेणीतील गोदामांच्या मागणीत पुणे आणि दिल्ली-एनसीआर यांचे



योगदान ४५ ते ५० टक्क्यांपर्यंत आहे. पुणे आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) ही औद्योगिक केंद्रे म्हणून उदयास येत आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणानंतर (एमएमआरडीए), पुणे हे देशात सर्वाधिक वेगाने वाढणारे दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. घरांच्या विक्रीत पुण्याने वरचे स्थान राखले आहे. याशिवाय, वेअरहाउसिंग आणि कार्यालयीन जागांच्या विक्रीतही जागतिक पातळीवर पुणे महत्त्वाचे शहर म्हणून नावारूपास येत आहे. मायक्रोसॉफ्टने पुण्यात नुकतीच ५२० कोटी रुपये किमतीची १६.४ एकर जागा खरेदी केली.

टेस्लासारखी कंपनीही पुण्यात येत आहे. गेल्या पाच वर्षांत (२०१९-२०२४) पुणे शहरातील रोजगारांमध्ये आठ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. पुण्यातील एकूण कर्मचाऱ्यांपैकी ३८ टक्के कर्मचारी 'ए' आणि 'ए-प्लस' श्रेणीतील कार्यालयांमध्ये कार्यरत आहेत. शहरात नजीकच्या भविष्यात रोजगाराच्या मोठ्या संधी आहेत. पुणे शहराने चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहीत (जानेवारी-जून २०२४) गोदाम विक्रीतील उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

रोजगार संधी वाढण्याची शक्यता असल्याने गोदाम आणि कार्यालयीन जागांची आवश्यकताही वाढणार आहे. त्यामुळे त्या दृष्टीने बांधकाम क्षेत्राने विचार करायला हवा. नजीकच्या काळात घरांच्या विक्रीसोबतच पुण्यात नोकऱ्यांच्या संधींमध्येही वाढ होण्याची शक्यता आहे. राज्याची राजधानी नसतानाही पुणे हे सर्व बाजूंनी विकसित होत असलेले एकमेव शहर आहे. कार्यालयीन जागांच्या बाबतीत विचार केल्यास, पुढील वर्षात पुणे १०० मिलियन क्लबमध्ये प्रवेश करेल. वेअरहाउसिंग क्षेत्रातही पुणे देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे.